## यशस्वी क्रीडापटूंचा महसूल मंत्र्यांच्याकडून सत्कार

मुंबई, दि. १ : क्रीडा क्षेत्रात यश मिळविणाऱ्या क्रीडापटूंचा सत्कार महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांच्या हस्ते आज मंत्रालयात करण्यात आला. यावेळी कामगार राज्यमंत्री विजय देशमुख उपस्थित होते.

आंतर शालेय क्रिकेट स्पर्धेत ३२३ चेंडूत नाबाद१००९ धावा काढून विश्वविक्रम केलेल्या प्रणव धनावडे (मुंबई), तसेच दक्षिण आशियाई स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या भारतीय खो -खो संघाची कर्णधार सारिका काळे, अर्जुन पुरस्कार प्राप्त कविता राऊत (नाशिक) यांचा सत्कार करण्यात आला.

००००